Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९, अंक १ ] गुरूवार, जानेवारी १९, २०२३/पौष २९, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये १८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**संदर्भ** :–(१) मा. अवर सचिव, नगरविकास विभाग यांचे पत्र क्र. एमसीओ-२०२१-प्र. क्र. २०७-नवि १४, दिनांक २८-१-२०२२.

(२) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.

(३) या कार्यालयाचे आदेश क्र. कार्या-१-कलि-३-नपाप्र-कावि-१८-२०२३, दिनांक ४-१-२०२३.

(४) या कार्यालयाचे आदेश क्र. कार्या-१-कलि-३-नपाप्र-कावि-१९-२०२३, दिनांक ४-१-२०२३.

(५) मुख्याधिकारी, नगरपंचायत मोहाडी यांचे पत्र जा. क्र. नपंमो-मुअ-७४-२०२३, दिनांक ९-१-२०२३.

**आदेश**

क्रमांक कार्या-१-कलि-३-नपाप्र-कावि-५८-२०२३.—

ज्याअर्थी, भंडारा जिल्ह्यातील नगरपंचायत मोहाडी या नगरपंचायतीमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका २०२१-२२ चा निकाल दिनांक १९ जानेवारी २०२२ रोजी जाहीर करण्यात आला. सदर निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांची नावे दिनांक २५ जानेवारी २०२२ रोजीच्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३४१ ब-१ मधील तरतुदीनुसार निवडून आलेल्या सदस्यांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून २५ दिवसाचे आत अध्यक्षाच्या निवडणुकीकरिता जिल्हाधिकारी कळविल असे नमूद आहे. तसेच उक्त अधिनियमातील कलम ३४१ ब-२ पोटकलम १ मधील तरतुदीनुसार प्रत्येक नगरपंचायतीचा एक उपाध्यक्ष असेल;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३४१ (ब)-२ पोटकलम ७ अन्वये उपाध्यक्षाचे पद कोणत्याही कारणामुळे का होईना रिक्त झाले असेल तर पोटकलम (१ ते ३) मध्ये ठरवून दिलेली कार्यपद्धती अनुसरून ते रिकामे पद भरण्यात येईल आणि अशा रितीने निवडून आलेला उपाध्यक्ष असे पद रिक्त झाले नसते तर त्याचा पुर्वाधिकारी अशा नैमितिक रिक्त पदावर जेवढ्या मुदतीकरिता राहिला असता तेवढ्याच उर्वरित मुदतीकरिता उपाध्यक्ष असेल. करिता उर्वरित मुदतीकरिता उपाध्यक्ष निवड करण्याविषयीची विशेष सभा संदर्भ (३) व (४) अन्वये आयोजित करण्यात आली. मुख्याधिकारी, नगरपंचायत मोहाडी यांनी संदर्भ (५) अन्वये उपाध्यक्ष यांची निवड झाल्याचे कार्यवृत या कार्यालयास सादर केले आहे.

त्याअर्थी, मी, योगेश कुंभेजकर, जिल्हाधिकारी, भंडारा, नगरपंचायत मोहाडी येथील निवडून आलेले उपाध्यक्ष यांची नावे खालीलप्रमाणे अधिसूचित करित आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | नगरपंचायतीचे नाव | निवडूण आलेल्या उपाध्यक्षाचे नाव |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | मोहाडी | सचिन बालचंद गायधने |

भंडारा :
दिनांक १८ जानेवारी २०२३.

**योगेश कुंभेजकर,**
जिल्हाधिकारी, भंडारा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.